म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय मो. वा.
दा. क्र. २५२५.

२५२५

# आई

डॉ. माधव कामल.

IRBK-0102525
IRBK-0102525


म. ग्रं.
विषय
वा. नं.

दा. क्र. 2424.

# 'आं ऽई'

म. ग्रं. सं. ठाणे.
2424

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. 2424 नों. दि ...
वि. ...

लेखक :—

माधव कामत,

कोल्हापूर.

IRBK-0102525

महाराष्ट्र ग्रंथ भांडार लि., मुंबई ४

प्रकाशक :
**शंकर वामन कुलकर्णी,**
महाराष्ट्र ग्रंथ-भांडार, लि.,
मुंबई.

**किंमत पांच आणे**

चित्रकार :—**श्री. शिर्के पेन्टर**

( सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन )

द्वितियावृत्ति १९४६

मुद्रक :
**रा. का. तटणीस**
श्रीलक्ष्मी-नारायण प्रेस,
मुंबई नं. २

म. ग्रं. सं. ठाणे.

मुलांचीं मनें आपलीशीं करणारे

प्रिय गुरुवर्य

## एम्. आर्. देसाई

B. A., M. E. D. ( Leeds )

यांच्या गोड

**स्वभावास—**

## क्रम

कुत्रा आणि कोल्हा
कोळसा आणि खडू
खटार आणि मोटर
खुळा कावळा
चोरावर मोर
गाणारे चढाव
निरुपयोगी पाय
पण आणि परन्तु
कोण बुवा हा ?
सुपीक डोकें
आभाळांतील वीज
आ ऽ ई

—ज्यांनीं ज्यांनीं 'आऽई' साठीं आपल्या अडचणी बाजूला सारून मला मदत केली, त्या सर्वांचे आभार मी मानलेही असते; पण मातेच्या मायेचं ऋण कुबेराच्या संपत्तीनं तरी फिटण्यासारखं आहे का? मग उगीचच त्या सहृदयांचे आभार मानून पदरीं परकेपणा तरी कशाला घ्या?

**—माधव कामत**

शुक्रवार पेठ, कोल्हापूर.

१०—५—४०

## हांकेपूर्वी

" पुस्तक वाचलें. आजच्या लहान मुलांनीं काय
वाचावें ?. . . आजच्या मुलांनीं आजच्या
वाङ्मयांत कसा प्रवेश करावा ?. . .
या प्रश्नांवर उत्तर

# "आऽई"


असलीं पुस्तकें वाचावींत
एवढेंच सांगतां येईल."

जी. के. पाटील
B. A., B. T.

. . सं. ठाणे.

# कुत्रा आणि कोल्हा

एक होता कोल्हा.
फार फार भूक लागली त्याला.
तो गेला हरणाकडे.
‘ हरणा, हरणा, खायला दे. ’
‘ आज नाहीं बाबा, उद्यांला ये. ’
मग तो गेला सशाकडे.
‘ ससोबा, ससोबा, खायला दे. ’
‘ आज नाहीं बाबा, उद्यां ये. ’
नंतर तो गेला वाघाकडे.
‘ वाघोबा, वाघोबा, खायला दे. ’


Shirke

' आज नाहीं बाबा, उद्यां ये. '
शेवटीं तो गेला सिंहाकडे.
जंगलचा राजाच तो.
कोल्ह्याला वाटलं, देईल कांहीं तरी.
' महाराज, महाराज, खायला द्या. '
' आज नाहीं बाबा, उद्यांला या. '
खूप खूप कोल्हा हिंडला.
भारी भारी तो दमला.
कुत्रा भेटला त्याला.
त्याला वाटलं देव पावला.
' कुत्तेकाका, कुत्तेकाका, खायला द्याल ? '
हो, हो, माझ्या घरीं येशील ?
माझा मालक रोज रोज मला धुतो.
माझा मालक रोज रोज मला खेळवतो.
माझा मालक रोज रोज मला फिरायला नेतो.
माझा मालक रोज रोज मलं गांवांतून मिरवतो.

आऽई

किती किती चांगला आहे तो.

तुलासुद्धां घेईल ठेवून तो.

'पण कुत्तेकाका, तुम्हीं पंढरीस जातां वाटतं ?'

'नाहीं बुवा, कशावरून म्हणतोस ?'

'मग कुत्तेकाका, गळ्यांत ही माळ कसली ?'

'अरे, ती माझ्या मालकाची सांखळी.'

'ती कशाला ?'

'तिनं बांधून ठेवतो तो मला. नंतर तो मला देतो भाकरी दुधाशीं.'

'नको तुझी भाकरी दुधाशीं,
राहीन मी उपाशी.'

# कोळसा आणि खडू

कोळसा काळा काळा कुळकुळीत असतो. खडू गोरा गोरा पान असतो. पण मला कोळसाच फार आवडतो. कोळसा उगाळावा तितका काळा; पण कोळसा उगाळणं का शहाणपणाचं आहे ? कोळसा म्हणजे गंधाचं खोड नव्हे.

कोळशावर आगगाडी चालते.

कोळशावर आगबोट चालते.

कोळशावर गिरणी चालते.

कोळसा हें यंत्राचं अन्न आहे.

कोळसा जाळून घेतो म्हणूनच ना आमचा सकाळीं भात शिजतो ! किती किती चांगला


आहे तो ! खडूचा तसा काय उपयोग आहे? खडू नसेल तर एक वेळ चालेल. पण कोळसा नसेल तर चालणंच शक्य नाहीं. फळ्याला पांढरा रंग देऊन त्याच्यावर खडूसारखं कोळशानं नाहीं का लिहितां येणार? म्हणूनच मला खडूपेक्षां कोळसा फार आवडतो. असेना का तो काळा !

**गोऱ्यापेक्षां काळाच जवळचा वाटतो मला !**

---

# खटार आणि मोटर

एक होती मोटर; एक होती खटार.
मोटर म्हणे, " मी चांगली. "
खटार बोले, " मी चांगली. "



" तूं आहेस बैलाची, मी आहे यंतराची,
मी जाईन पळून; तूं बसशील नडून. "
खटार लागली रडूं, मोटर लागली हंसूं.

आऽई

शोफरनं सारं ऐकलं, मोटरींतून तेल काढलं.
मोटर लागली रडूं, खटार लागली हंसूं.
शोफर सांगे, हसूं नये, शोफर सांगे, रडूं नये.
कारण ' चालविता धनी—
वेगळाची, धरा मनीं.
खटार लागली हंसूं, मोटर लागली हंसूं.
मग नाहीं केला तंटा,
असं वागायला झटा.

---

# खुळा कावळा




एक होता कावळा, तो होता खुळा.
एक होती चिमणी, ती होती शहाणी.
कावळा म्हणे बाळूला, ‘ मला दे खायला. ’
चिमणी म्हणे बाळूला, ‘ मला दे खायला. ’

बाळू म्हणे काऊला. ' तुझे दे पीस मला. '
काऊ म्हणे, ' मी नाहीं जा. '
चिऊ बोले, ' मी देतें जा. '
पिस दिलें चिऊनं. पेढे दिले बाळूनं.
पिस लागले उडूं, कावळा लागे रडूं.
चिमणी लागली हसूं, बाळू लागला नाचूं.


# चोरावर मोर

तुरा चोरला चोरानं.
तो पाहिला मोरानं.
मोरानं सांगितलं चोराला,
" तो पहा नदींत चांदीचा गोळा. "
चोरानं तुरा ठेवला कडेला;
आणि पाण्याच्या गेला तळाला.
**तुरा अडकविला डोकीला,**
**अन् मोर जंगलांत पळाला**
चांदोबा पाहून चोर आला बाहेर;
पण तिथं कुठं होता मोर ?
तुरा घेऊन मोर गेला पळून;
इकडं चोर बसला फसून.

---


Shirka

# गाणारे चढाव




आजोबा जोडे घालतात. बाबा पायतण घालतात. दादा बूट घालतो. ताई उंच टांचेचे बूट घालते. परंतु यांपैकीं कुणालाच बोलतां येत नाहीं ! सारीं सारीं मुकीं आहेत आमच्या इवल्याशा बेबीसारखीं.

आई,


पण आमच्या मामांचे खडाव "चट पट, चट पट," बोलतात.

परंतु आमच्या गणू गवळ्याचे कातडी चढाव गाणं म्हणतात, "चुर कूंय्, चुर कूंय्" म्हणून मला तेच फार फार आवडतात. मला पण तसलेच हवेत.



ग्रं. सं. ठाणे.


# निरुपयोगी पाय



दोन पायांनीं माणसं चालतात.
दोन पायांनीं माणसं पळतात.
दोन चाकांची सायकल चालते.
दोन चाकांची फटफट पळते.

आऽई

छान चालते तीन चाकी सायकल
परंतु तीन पायी स्टूल ?
चार पायांचे बैल चालतात.
चार पायांचीं घोडीं पळतात.
चार चाकांची मोटार धांवते.
परंतु चार पायांचें मेज ?



# 'पण आणि परंतु'

सकाळीं आई म्हणाली,

"बाळू, तुला लाडू देतें, **पण** स्वच्छ तोंड धुतलंस तर हं?"

दोनप्रहरीं बाबा म्हणाले,

"बाळू, मी मुंबईला जाणार आहें तिथून तुला खेळ आणीन, **परंतु** तूं अभ्यास केलास तर बरं?"

संध्याकाळीं ताई म्हणाली,

"बाळू, मी तुला गोळ्या देईन, **पण** माझं काम ऐकलंस तर, समजलास?"

रात्रीं दादा म्हणाला,

"बाळू, मी तुला नाटकास नेईन, **परंतु** तूं

कधींच शाळा चुकविणार नसलास तर, बरं का ?"

छे, छे ! जगांत 'पण आणि परंतु ' हे शब्दच नसते तर किती मजा आली असती, नाहीं ?

---


# कोण बुवा हा ?

तें तोंड. तीं कापडं.

ते डोळे. ते केंस काळे.

ते कान. ती वाकडी मान.

ते डूल. तें कोटावरील फूल.



आऽई

ते हात फारच कोमल होत.

ते पाय फारच छान होत.

अगदीं सारं सारं माझ्यासारखं.

कोण बुवा हा. ?

जणूं दुसरा मीच !

होयच मुळीं.

**माझाच किती केलं तरी फोटो ना तो.**


---

# सुपीक डोकं !

नाकानं वास घेतात.
डोळ्यानं पाहतात.
हातानं धरतात.
पायानं चालतात.
तोंडानं खातात.
दांतानं चावतात.
जिभेनं चव समजते.
कानानं ऐकूं येतें.
पण बेटें डोकं काय करतं ?
**केंस मात्र वाढवितं.**

# आभाळांतील वीज.

मेणबत्ती मिणमिणते. सातआठ तासांत संपते
चिमणी मिणमिणते; तेल संपेपर्यंत तेवते.



सतेज आहे कंदील; पण पोटांत असेपर्यंत तेल.


गॅसबत्ती सतेज आहे फार, पण हवा अन् तेल भरपूर असेल तर.

विजेचे दिवे तर सर्वांहून तेजवान् होत; परंतु; तारा ठीक आहेत तोंपर्यंत.

सूर्याचा उजेड तर या साऱ्याहून खूप असतो; पण बारा तासांहून फार नसतो.

परंतु थोडा वेळ टिकणारी आणि सारं जग उजळून, झोंपलेल्या जगावर 'कडाऽड, कड' असा चाबूक ओढून जागं करणारी आभाळांतील वीज होणंच मला आवडतं.

---



# आऽई

आई मला भात भरवते. आई मला दूध पाजते.
आई मला दंगा केला कीं मारते.
आई मला आंघोळ घालते.
आई किती किती चांगली आहे.
आई किती किती वाईटहि आहे.
लाडूहि देते, धम्मकलाडूहि पाठींत आपटते.
तूप-साखर-पोळी देते, चापटपोळी पण लगावते.
खरोखर आई चांगली आहे कीं वाईट ?
आई कौतुक करते.
आई कानहि पिरंगळते.
आई चांगली आहे.
आई वाईटहि आहे.

आऽई

छे, छे, ! कांहींच समजेना.

छे, छे ! कांहींच कळेना.

आईलाच हांक मारून विचारावं झालं,

"आऽई आऽऽई, आऽऽऽई"!

—वन्दे मातरम्—

---

म. औ. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २५२५ नों. दि ........
वि. ७।७। .... क्र. ........

IRBK-0102525

IRBK-0102525

# बालवाचकांकरितां आमचीं पुस्तकें

१ आई (माधव कामत) ०—५—०
२ विक्रमाची साडेसाती (ताराबाई मोडक) ०—८—०
३ जादूचा घोडा ( ,, ) ०—४—०
४ सवाई विक्रम ( ,, ) ०—५—०
५ गारांचा पाऊस (शं. रा. देवळे) ०—४—०
६ गंपूदादाचा लाकूडदांड्या (ताराबाई मोडक) ०—५—०
७ वानरांची सर्कस (वसंत वैद्य) ०—४—०
८ प्रवासी गलिव्हर (दीनानाथ म्हात्रे) ०—६—०
९ तीन पण व इतर गोष्टी (वेंबळकर) ०—५—०
१० चतुर तुतारीवाला (वेंबळकर) ०—५—०
११ अजितकुमार (ताराबाई जाधव) ०—४—०
१२ रत्नकंकण ( ,, ) ०—४—०
१३ पालवी (वसंत वैद्य) ०—५—०
१४ मजेदार कथा (यदुनाथ थत्ते) ०—६—०
१५ नूतन नीतिकथा भाग १ (गो. वा. पंडितराव) ०—१०—०
१६ ,, ,, ,, २ ( ,, ) ०—१०—०
१७ हिरवा पक्षी (दीनानाथ म्हात्रे) ०—५—०
१८ चिमण्या कळ्या भा. १ ला (मालतीबाई दांडेकर) ०—५—०
१९ ,, ,, २ रा ( ,, ,, ) ०—५—०
२० सुनंदा (अक्कलकोटकर) ०—५—०
२१ एका रात्रींत देऊळ (यदुनाथ थत्ते) ०—८—०
२२ तान्या आणि वान्या (ग. कृ. गणेश जोशी) ०—५—०
२३ जादूचा मंत्र (सौ. विद्या सिधये) ०—५—०
२४ पिंजऱ्यांतील प्राण (रं. म. जोशी) ०—४—०
२५ चिमण्यांची चिवचिव (सौ. शांताबाई पेंडसे) ०—४—
२६ रोझा (दीनानाथ म्हात्रे) ०—४—
२७ बुकर टी. वॉशिंग्टन (दीनानाथ म्हात्रे) ०—५—०
बिरबल भा. १, २, ३, ४. प्रत्येकी ०—८—०
सुलभ महाभारत भा. १ ते ६ ,, ०—८

## शिशुसाहित्य

१ कांचनगंगा (सौ. वाळिंबे) ०—४
२ निळें आकाश ( ,, ) ०—५
३ रुपेरी किरण ( ,, ) ०—४
४ सात तारका ( ,, ) ०—४

दि महाराष्ट्र ग्रंथ भांडार लि., मुंबई ४